| MHSO070003982023 | नियमित दिवाणी दावा क्र. ३२४/२०२३ मधील निशाणी क्र. ३५ खालील आदेश<br>(पारीत दिनांक १९ डिसेंबर २०२५) |
| --- | --- |

१. प्रतिवादीनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश XXVI नियम ९ नुसार कोर्ट कमिशनर यांची नेमणुक करुन वादी, प्रतिवादी यांच्या मिळकती व त्यांच्या सभोवतालची सर्व परिस्थितीची पाहणी करुन अहवाल सादर करण्याकरीता दाखल केला आहे. वादीने निशाणी क्र. ३६ नुसार म्हणणे दाखल केले आहे. उभयपक्षकारांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले.

२. प्रतिवादींच्या कथनानुसार वादीने प्रस्तुतचा दावा हा निरंतर ताकीदीसाठी दाखल केला आहे. वादीने दाव्यात कथन केले आहे की प्रतिवादीच्या मिळकतीच्या पुर्व बाजुने दक्षिण–उत्तर चालीचा रस्ता असुन तो वादीला वापरण्याचा हक्क असुन सदर रस्ता वापरास प्रतिवादींनी हरकत करु नये अशी वादीने मागणी केलेली आहे. प्रतिवादीनी त्यांचे म्हणणे व कैफियत दाखल करुन नमुद रस्त्याचे अस्तित्व नाकारलेले आहे. वादीने यातील वहीवाटीच्या रस्त्यावर अतिक्रमण करुन वादी नसलेल्या रस्त्याबाबत हक्क सांगत आहे. वर नमुद परिस्थिती असताना दावा व कैफियत यातील वाद विषयांची विसंगती विचारात घेता अंतिम न्यायनिर्णय सुलभ होण्याकरीता वादी, प्रतिवादी यांच्या मिळकती व त्यालगतची परिस्थितीची कोर्टापुढे येणे आवश्यक आहे. त्याकरीता कोर्ट कमिशनरची नेमणुक करण्यात येऊन सर्व वस्तुस्थिती पाहुन त्याचा नकाशासह अहवाल दाखल करण्याबाबत विनंती केली आहे.

३. वादीने प्रस्तुतचा अर्ज खरा व कायदेशिर नसुन तो अमान्य केला आहे. प्रतिवादींनी प्रस्तुतचा अर्ज केवळ पुरावा गोळा करण्यासाठी दिला आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश XXVI नुसार पुरावा गोळा करण्यासाठी कोर्ट कमिशनर नेमता येत नाही. वादीने दाव्यासोबत तहसिलदार पंढरपूर यांनी रस्ता केसकामी केलेल्या स्थळ पाहणीचा

नकाशा दाखल केला आहे. त्यामुळे पुन्हा कोर्ट कमिशनर नेमता येणार नाही. सदरचा अर्ज हा दाव्याचे काम लांबणीवर टाकण्याकरीता दाखल केला आहे. सबब, प्रतिवादींचा अर्ज रद्द करण्याची विनंती केली आहे.

**४.** प्रस्तुत प्रकरणाचे अवलोकन केले असता वादीने प्रस्तुतचा दावा निरंतर ताकीदीसाठी दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी निशाणी क्र. ४२ वर त्यांची कैफियत सादर केली आहे. वाद मिळकत १अ ही वादीची घरमिळकत असुन वाद मिळकत १ब ते १ड ही प्रतिवादी क्र. १ ते ५ यांची घरमिळकत वादीच्या मिळकतीच्या उत्तर दिशेला आहे. सर्व मिळकतींच्या पुर्व बाजुने उत्तर ते दक्षिण चालीचा रस्ता असल्याचे व तो रस्ता वादीच्या मालमत्ता क्र.३३८ पर्यंत येऊन संपत असल्याचे वादीचे दाव्यात कथन आहे. सदर रस्त्यावर वाद मिळकत १ब आणि १अ यांच्या मधील जागेत प्रतिवादींनी दगड टाकुन अडथळा केल्याचे वादींचे कथन आहे. त्याबाबत हस्तलिखित नकाशा दाव्यासोबत जोडला आहे.

**५.** प्रतिवादींनी कैफियत दाखल करुन परिच्छेद क्र.४ मध्ये वाद मिळकत १अ च्या लगत पुर्व बाजुला ग्रामपंचायतीने तयार केलेला अंतर्गत कॉक्रीटचा रस्ता होता व आहे असे कथन केले आहे. तथापी, रस्ता आणि वादीची दावा मिळकत याच्या दरम्यान असलेल्या खुल्या जागेत वादी व कुटूंबियांनी अतिक्रमण करुन बेकायदेशिर बांधकाम केलेले आहे, असे प्रतिवादींचे कथन आहे. परंतु, प्रस्तुतच्या अर्जात प्रतिवादींनी दाव्यात नमुद केलेल्या रस्त्याचे अस्तित्व नाकारल्याचे कथन केले आहे. कैफियतीचे अवलोकन केले असता विरुध्द परिस्थिती दिसुन येते. अद्यापी तुर्तातुर्त मनाईचा अर्ज चौकशीसाठी प्रलंबित आहे. वादीने त्याची सकृतदर्शनी केस अभिलेखावर आणणे आवश्यक आहे. सदरची सकृतदर्शनी परिस्थिती ही न्यायालयीन आयुक्तांची नेमणुक करुन अभिलेखावर आणता येऊ शकत नाही. दाव्याच्या सध्याच्या चौकशीपुर्व स्थितीच्या वेळी न्यायालयीन आयुक्तांची नेमणुक करता येत नाही. तसेच वादीने दाव्यात कथन केलेली परिस्थिती ही दिनांक १०.१२.२०२१ रोजी प्रतिवादींनी दगड टाकुन

रस्ता आडवण्याचा प्रयत्न केला, ही बाब इतर पुराव्यांच्या आधारे अभिलेखावर आणणे सहज शक्य आहे. सबब, दावा मिळकतीवरील प्रत्यक्ष परिस्थिती अभिलेखावर आणण्यासाठी न्यायालयीन आयुक्तांची नेमणुक करणे आवश्यक नाही. तसेच तशी नेमणुक दाव्याच्या चौकशीपुर्व परिस्थतीमध्ये कायदेशिर नाही. प्रस्तुत दाव्यातील तथ्यांची पाहणी केली असता न्यायालयीन आयुक्त नेमण्याची गरज दिसुन येत नाही. सबब, प्रतिवादींचा अर्ज नामंजुर होण्यास पात्र आहे. वरील कारणमिमांसेनुसार खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

**<u>आ दे श</u>**

१. अर्ज (निशाणी क्र. ३५) नामंजुर करण्यात येत आहे.

२. खर्चाबाबत आदेश नाही.

SONALI SHASHIKANT RAUL

Digitally signed by SONALI SHASHIKANT RAUL
Date: 2025.12.19 17:02:41 +0530

**(एस.एस.राऊळ)**

**दिनांक – १९.१२.२०२५.**

**सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर, पंढरपूर,**
**जि. सोलापूर.**

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/ Order are same word to word as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno. | :- | D.S.Landage, Stenographer (Grade-III) |
| Court Name | :- | Jt. Civil Judge (Jr.Dn.) Pandharpur, Dist. Solapur. |
| Date | :- | 19.12.2025. |
| Order signed by the presiding officer on | :- | 19.12.2025. |
| Order uploaded on | :- | 19.12.2025. |